# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

हिशेब विभाग

## "पंतप्रधान जन धन योजना" - नियमावली

भारताच्या मा.पंतप्रधानांनी दि.१५ ऑगस्ट २०१४ रोजी प्रधान मंत्री जन - धन योजना घोषित केली आहे. या योजने अनुषंगाने आर्थिक समावेश अंतर्गत खाते नसलेल्या व्यक्तींची बँकेत खाती उघडावयाची आहेत. या योजनेअंतर्गत उघडणा-या खात्यावर त्या खातेदारांना मिळणा-या सरकारी सुविधांचा लाभ जमा होणार आहे.

**खातेदाराला द्यावयाच्या सुविधा / लाभ :-**

१. पंतप्रधान जन - धन योजने अंतर्गत उघडलेल्या खातेवर किमान बाकी रक्कमची आवश्यता नाही.

२. सदर खातेदारास "Rupay Debit Card" सुविधा द्यावयाची आहे.

३. भविष्यात सदर खातेदारास रु.१.०० लाख (रु.एक लाख ) पर्यंत अपघात विम्याचा लाभ मिळणार आहे.

**खाते उघडताना खातेदारांनी करावयाची पूर्तता :-**

१. पंतप्रधान जन - धन योजने अंतर्गत खाते उघडण्यासाठी येणा-या व्यक्तीचे इतर कोणत्याही बँकेत बँक खाते नसावे.

२. खाते उघडताना KYC पूर्ततेच्या अनुषंगाने खाते उघडण्यासाठी आवश्यक म्हणून खालील दस्तऐवज घेणे गरजेचे राहिल.

अ. आधारकार्ड (आधारकार्ड असल्यास इतर प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.) खातेदाराने दिलेला पत्ता वेगळा असल्यास पत्ता प्रमाणित करुन घेणेसाठी वीज बिल, टेलिफोन बील इ. घेणे.

**ब आधार कार्ड नसल्यास पुढील पैकी कोणतेही एक -**

१ **ओळखीसाठी :-** पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, अधिकृत जन अधिकारी / लोकसेवक यांचे पत्र, किंवा मान्यताप्राप्त संस्थेचे ओळखपत्र याचे जॉब कार्ड

२. **पत्त्यासाठी :-** वीज बील, टेलिफोन बिल, जन्म किंवा विवाह प्रमाणपत्र.

ही योजना केंद्र सरकार पुरस्कृत असल्यामुळे त्याची सकारात्मक कार्यवाही करणे अनिवार्य असणार आहे.